RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१८७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.२० ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# आरक्षण तर असायलाच हवं...!

## यूपीएससी च्या भरतीवरून एनडीए मध्ये फूट

### जेडीयू-एलजीपी चाही विरोधकांच्या सुरात सूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०नवी दिल्ली-** सध्या युपीएससीतील लॅटरल एंट्रीच्या मुद्द्यावरू देशात राजकारण सुरू आहे. केंद्र सरकारमध्ये ४५ वरिष्ठ अधिकाऱ्यांची 'लॅटरल एंट्री'द्वारे नियुक्ती करण्याचा प्रस्ताव वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अर्थात यूपीएससीच्या अधिसूचनेवर केवळ विरोधकच नाही तर सत्ताधारी एनडीएतील पक्षांतूनही विरोध होताना दिसत आहे. एनडीएतील नितीश कुमार यांच्या जनता दल (संयुक्त) आणि चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षाने (रामविलास पासवान)ही या निर्णयाचा विरोध केला आहे. यांच्या मते, कुठल्याही सरकारी भरतीमध्ये आरक्षणाशीची तरतूद असणे आवश्यक आहे. याशिवाय, चंद्राबाबू नायडू यांचा तेलुगू देसम पक्ष (टीडीपी) नोकरशाहीतील 'लॅटरल एंट्री'च्या समर्थनात दिसत आहे. तसेच, काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षासह अनेक विरोधी पक्षांनीही लॅटरल एन्ट्रीद्वारे भरती करण्यावर आक्षेप नोंदवला आहे.यूपीएससी कडून शनिवारी लॅटरल एंट्रीद्वारे ४५ पदांच्या भरतीसाठी जाहिरात देण्यात आली. यानंतर, लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी रविवारी याविरोधात मोर्चा उघडला. यानंतर सपा प्रमुख अखिलेश यादव आणि बसपा प्रमुख मायावती यांनीही याला विरोध केला. तर सोमवारपर्यंत यासंदर्भात एनडीएतील घटक पक्षांची नाराजीही समोर आली.



'सरकारी नौकरी में आरक्षण होना चाहिए' -

यासंदर्भात झढख सोबत बोलताना एलजेपीचे (रामविलास) अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री चिराग पासवान म्हणाले, कुठल्याही सरकारी नियुक्तीत आरक्षणाची तरतूद असायला हवी. यात कसल्याही प्रकारे किंतु परंतु नाही. खाजगी क्षेत्रात आरक्षण नाही आणि जर सरकारी पदांवरही ते लागू केले जात नाही... ही माहिती रविवारी माझ्या निदर्शनास आली आणि हा माझ्यासाठी चिंतेचा विषय आहे. तसेच, आपला पक्ष अशा प्रकारच्या निर्णयांचे कदापी समर्थन करत नाही.

### विरोधकांना मुद्दा देत आहे सरकार

जदयूचे राष्ट्रीय प्रवक्ता केसी त्यागी द इंडियन एक्सप्रेससोबत बोलताना म्हणाले, आम्ही पहिल्यापासूनच सरकारांना आरक्षण भरण्यासंदर्भात मागणी करत आहोत. आम्ही राम मनोहर लोहिया यांचे अनुयायी आहोत. शतकानुशतके लोक सामाजिकदृष्ट्या वंचित असताना आपण योग्यता का मागत आहात? सरकारचा हा आदेश आमच्यासाठी चिंतेचा विषय आहे. असे करून सरकार विरोधकांना मुद्दा देत आहे. एनडीएला विरोध करणारे लोक याचा दुरुपयोग करतील.

## अरेच्चा... पाकिस्तानी स्टेडियम आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी योग्य नाहीत

### पीसीबी प्रमुखांनीचं दिली जाहीर कबुली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०नवी दिल्ली-** पाकिस्तानला पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चं आयोजन करायचं आहे, ज्याबद्दल आधीच अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

भारतीय क्रिकेट संघ पाकिस्तानला जाणार का असा प्रश्न उपस्थित होत असून, ही स्पर्धा हायब्रीड मॉडेलवर आयोजित केली जाण्याचीही शक्यता आहे. तरीही पाकिस्तान आपल्या तयारीत व्यस्त आहे.

दरम्यान, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या (पीसीबी) प्रमुखांनीच आपल्या देशातील क्रिकेट स्टेडियमचा पर्दाफाश केला असून पाकिस्तानचे



स्टेडियम आंतरराष्ट्रीय क्रिकेटचं आयोजन करण्यास योग्य नसल्याचं म्हटलं आहे.

**खुद्द पीसीबी अध्यक्षांनी केलं मान्य :** सध्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या संदर्भात पाकिस्तानातील लाहोर आणि कराचीसारख्या पाकिस्तानातील सर्वात लोकप्रिय आणि प्रमुख स्टेडियममध्ये काम सुरु आहे. पीसीबी स्पर्धेपूर्वी त्यांची तयारी करण्यात व्यस्त आहे, ज्यावर करोडो रुपये खर्च केले जात आहेत. याचं मुख्य कारण म्हणजे पाकिस्तानी स्टेडियमची खराब स्थिती, ज्याबद्दल चाहते आणि प्रसारमाध्यमे यापूर्वी अनेकदा प्रश्न उपस्थित करत आहेत आणि आता खुद्द पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नकवी यांनीच हे मान्य केलं आहे.

## छगन भुजबळांच्या बालेकिल्ल्यात मनोज जरांगेंची फिल्डिंग!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० नाशिक -** मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभेच्या मैदानात उतरण्याचा निर्णय जाहीर केला आहे. राज्यात विधानसभेच्या तयारीसाठी सर्व पक्ष कामाला लागले असतानाच मनोज जरांगे पाटील यांनीही मोर्चेबांधणी सुरू केली आहे. जरांगे पाटील यांनी नाशिकमध्ये विधानसभेच्या १५ जागांचा मनोज जरांगे पाटील यांनी आढावा घेतला आहे.राज्यात सध्या मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच



तापला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी रान उठवले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मराठा आरक्षणाच्या मुद्द्याचा प्रभाव पाहायला मिळाला. त्यानंतर आता मनोज जरांगेंकडून थेट विधानसभेच्या रिंगणात उमेदवार उतरवण्याची तयारी केली असून त्यासाठी जोरदार- जोरबैठका सुरू आहेत.आगामी विधानसभा निवडणुकीसाठी नाशिक जिल्ह्यातील १५ विधानसभेच्या जागांचा जरांगे पाटील यांच्याकडून आढावा घेण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यातील १५ जागांसाठी १५० मराठा उमेदवार इच्छूक असून या सर्वांचा अहवाल जरांगे पाटील यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे आता येत्या २९ तारखेला मनोज जरांगे पाटील काय निर्णय घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## बोलतांना अचानक कोसळले, बेशुद्ध पडले अन् मृत्यूने गाठले; काँग्रेस नेत्याला हार्ट अटॅक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० बंगळुरू**

कर्नाटकची राजधानी बंगळुरूत एक हैराण करणारी बातमी समोर आली आहे. येथे एका पत्रकार परिषदेत बोलत असतानाच काँग्रेस नेत्याचा मृत्यू झाला. रविचंद्रन असे या नेत्याचे नाव असून ते लाल मॉर्निंग वॉकर्स असोसिएशनचे अध्यक्ष होते. कर्नाटकात सध्या मुडा जमीन घोटाळा चांगलाच गाजत आहे. या घोटाळ्यात मुख्यमंत्री सिद्धरामय्या अडचणीत आले आहेत. मुख्यमंत्र्यांना पाठिंबा देण्याच्या उद्देशाने या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

कुरुबारा संघाचे अध्यक्ष आणि कोलार जिल्ह्यातील रहिवासी रविचंद्रन यांना अचानक हॉर्ट अटॅक आला आणि ते जागेवरच कोसळून बेशुद्ध झाले. ही घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे. यानंतर त्यांना तत्काळ कनिंघम रोड येथील




फोर्टिस रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र येथे आल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची सर्वत्र चर्चा सुरू आहे.या घटनेवर कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शोक व्यक्त केला. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहीली. कर्नाटक राज्य मागासवर्ग आणि अल्पसंख्यक असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत आमच्या पक्षाचे कार्यकर्ते रविचंद्रन यांचा हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांचा मृत्यू अतिशय दुःखद आहे.

## राज्यात डिसेंबरमध्ये साडेसात हजार पदांसाठी पुन्हा पोलीस भरती; मुंबई पोलीस दलासाठी बाराशे पद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० मुंबई-** पोलीस होण्याचं स्वप्न पाहणाऱ्या तरुण-तरुणींसाठी खुशखबर. राज्यात डिसेंबरमध्ये पुन्हा पोलीस भरती केली जाणार आहे. पोलीस दलातील तब्बल साडेसात हजार पदांसाठी पुन्हा पोलीस भरती प्रक्रिया राबवली जाणार असल्याची माहिती मिळत आहे. यापैकी तब्बल बाराशे पदं मुंबई पोलीस दलासाठी भरली जाणार आहेत.

राज्यात गेल्या दोन वर्षांत जवळपास ३५ हजार पदांवर पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात आलेली. त्यानंतर आता पुन्हा एकदा साडेसात हजार पदांसाठी डिसेंबरमध्ये पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. राज्यात २०२२ आणि २०२३ मध्ये मोठ्या पोलीस भरती प्रक्रियेची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर डिसेंबरमध्ये पुन्हा पोलीस भरती होणार आहे.

कोरोना काळात रखडलेली पोलीस भरती प्रक्रिया

कोरोना व्हायरसनं संपूर्ण जगभरात हैदोस माजवला होता. त्यानंतर संपूर्ण जग ठप्प झालं होतं. याच कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव झाल्यानंतर सुमारे तीन वर्ष राज्य पोलीस दलात भरती झाली नाही. झपाट्यानं वाढणाऱ्या लोकसंख्येपुढे पोलिसांचं संख्याबळ कमी आहे. गेल्या दोन वर्षांत अनुक्रमे १८ हजार आणि १७ हजार पदांची भरती प्रक्रिया राबवण्यात आली होती. परंतु त्या तुलनेनं आणखी सात ते आठ हजार पोलीस संख्याबळ मिळणं अपेक्षित असल्यामुळे डिसेंबरमध्ये पुन्हा साडेसात हजार पदांसाठी भरती होण्याची शक्यता आहे.

काही दिवसांपूर्वी राज्यात



पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात आली होती. त्यावेळी लवकरात लवकर सध्याची १४ हजार ४७१ पदांची पोलीस भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश गृह विभागानं सर्व जिल्हा अधिकाऱ्यांना दिले होते. आतापर्यंत २५ जिल्ह्यांत पोलीस शिपाई, आठ जिल्ह्यांत चालक, शिपाई आणि पाच जिल्ह्यांत बॅण्डसमॅनच्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांमध्ये सप्टेंबरपर्यंत भरती पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात मुंबई पोलिसांना मैदान न मिळाल्यामुळे त्यांची भरती प्रक्रिया थोडी उशीरानं घेण्यात आलेली. सध्याची पोलीस भरती प्रक्रिया संपल्यानंतर राज्यात नवी पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.

**एकट्या मुंबई पोलीस दलात बाराशे पदांसाठी भरती**

डिसेंबरमध्ये राबवण्यात येणाऱ्या पोलीस भरती प्रक्रियेत मुंबई पोलीस दलासाठी बाराशे पदांवर भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. मुंबईत गेल्या वर्षी आठ हजार पदांची भरती झाली होती. त्यातील बहुतांश पोलीस त्यांचं प्रशिक्षण पूर्ण करून सप्टेंबरमध्ये पोलीस दलात दाखल होणार आहेत. मुंबईत ४२३० पोलीस शिपाई भरतीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या भरतीसाठी पोलिसांकडे ५ लाख ६९ हजार अर्ज आले आहेत. त्यापैकी दोन हजार ५७२ पोलीस हवालदार, ९१७ चालक, ७१७ तुरुंग हवालदार आणि २४ बँड्स मन पदांसाठी अर्ज करण्यात आलेत.

### महिला पोलीस भरतीसाठी पावणेतीन लाख अर्ज

राज्यात महिला पोलीस भरतीसाठी यावेळी ३९२४ पदांसाठी पावणेतीन लाखांहून अधिक महिलांनी अर्ज केले आहेत. त्यापैकी एक लाखाहून अधिक महिला उमेदवार उच्चशिक्षित आहेत. मुंबईला सर्वाधिक पसंती असून एक लाखांहून अधिक महिलांनी मुंबई पोलीस दलातील भरतीसाठी अर्ज केले आहेत.

## मी जिवंत आहे; अभिनेता श्रेयस तळपदेच्या मृत्यूची अफवा पोस्ट करत म्हणाला...

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० मुंबई-** अभिनेता श्रेयस तळपदेबद्दल सोशल मीडियावर एक खोटी पोस्ट जोरदार व्हायरल होत आहे. या पोस्टमध्ये अभिनेत्याच्या मृत्यूची खोटी बातमी होती. ही बातमी पाहून श्रेयसच्या चाहत्यांना मोठा धक्काच बसला. श्रेयस तळपदेला या फेक न्यूजची माहिती मिळताच, अभिनेत्याने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून याबद्दल एक पोस्ट शेअर केली आहे. तसेच तो जिवंत, आनंदी आणि निरोगी असल्याचं सांगितलं आहे. यासोबतच अभिनेत्याने आपल्या चाहत्यांचे आभारही मानले आहेत.




मी सर्वांना सांगू इच्छितो की मी जिवंत आहे, आनंदी आणि निरोगी आहे. ज्या पोस्टमध्ये माझ्या मृत्यूचा दावा केला जात होता त्या पोस्टची मला माहिती मिळाली. मला समजतं की मजा-मस्करी गरजेची आहे, परंतु जेव्हा त्याचा गैरवापर केला जातो तेव्हा खरं नुकसान होऊ शकतं. जोक म्हणून सुरू झालेल्या गोष्टीमुळे आता अनावश्यक त्रास निर्माण झाला आहे. खासकरून माझे कुटुंबीय, माझी काळजी असलेले लोक त्यांच्या भावनांशी खेळ सुरू आहे.

'मला लहान मुलगी आहे, जी दररोज शाळेत जाते, ती माझ्या तब्येतीबद्दल काळजीत असते आणि सतत प्रश्न विचारते आणि मी बरा आहे हे जाणून घेत असते. या खोट्या बातम्या तिला जास्त दुःखी करतात आणि त्याला अधिक प्रश्न विचारण्यास भाग पाडतात. जे लोक अशा प्रकारचा मजकूर टाकत आहेत त्यांनी ते थांबवावं आणि त्याचा काय परिणाम होईल याचा विचार करावा. काही लोक खरोखर माझ्या आरोग्यासाठी प्रार्थना करतात. पण अशा प्रकारे मजा-मस्करीचा वापर होणं हे हृदयद्रावक आहे.

'फक्त टार्गेट केलेल्या व्यक्तीलाच याचा फटका बसत नाही, तर त्याच्याशी संबंधित असलेले लोक जसं की त्याचं कुटुंब आणि विशेषत: लहान मुलं ही परिस्थिती पूर्णपणे समजून घेऊ शकत नाहीत. कृपया हे थांबवा. अशी मस्करी कोणाचीच करू नका. तुमच्यासोबत असं व्हावं हे मला वाटत नाही, त्यामुळे कृपया संवेदनशील व्हा असं श्रेयसने आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. वेलकम टू द जंगलच्या शूटिंगदरम्यान अभिनेत्याला हार्ट अटॅक आला होता. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. पण आता तो पूर्णपणे बरा आहे.

## पूजा खेडकरच्या अडचणी वाढणार? तपासासाठी दिल्ली क्राईम ब्रांचचे पथक महाराष्ट्रात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०पुणे-** काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत असलेली वादग्रस्त ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकर प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पूजा खेडकर प्रकरणाचा तपास करण्यासाठी दिल्ली पोलिसांचे पथक महाराष्ट्रात दाखल झालं आहे. सोमवारी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात आणि पूजा खेडकरच्या पुण्यातील घरी दिल्ली क्राईम ब्रांचने तपास केला आहे. त्यानंतर आज दिल्ली पोलीसांचं हे पथक अहमदनगर जिल्ह्यामध्ये तपास करणार आहे. खेडकर कुटुंबाचं मुळ गाव अहमदनगर जिल्ह्यातील भालगाव हे आहे. अहमदनगर जिल्हा रुग्णालयातून पूजा खेडकरला



दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात आले होते. त्यासंदर्भात देखील तपासाची शक्यता आहे.

पूजा खेडकरला दिल्ली उच्च न्यायालयाकडून २२ ऑगस्टपर्यंत अटकेपासून संरक्षण देण्यात आलेलं आहे. त्याआधी दिल्ली क्राईम ब्रांचला पूजा केडकर प्रकरणातील तपास करून यांची माहिती न्यायलयात देणं आवश्क आहे. त्या अनुषंगाने दिल्ली पोलिसांचे पथक सर्व तपास करत आहेत. २२ ऑगस्टपर्यंत केलेला तपास आणि अन्य माहिती दिल्ली पोलिस त्यांच्या सरकारी वकिलांच्या मार्फत कोर्टात मांडणार आहे, जेणकरून पूजा खेडकरला अटक करण्याची मागणी करता येईल.

## संपादकीय ......

# लाडकी बहीण; सावत्र मतदार!

राज्यातील महिलांसाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना सुरू केली. अगदी घरच्या लाडक्या बहिणींना जसा त्रास होऊ नये म्हणून वेळोवेळी भाऊ काळजी घेतो तशी काळजी घेत त्यातील अटी व शर्थी बाजूला करण्यात आल्या. ही योजना तशी आपल्या शेजारच्या मध्यप्रदेशात यशस्वी झाल्यानंतर महाराष्ट्रात लागू करण्यात आली. 'चांगले ते घेत जावे' या उक्तीने या योजनेचे स्वागतही व्हायलाच हवे. मात्र, विरोधकांना ही योजना पचनी पडणे शक्य नव्हते. त्यांनी लाडका भाऊ काढण्याची मागणी केली आणि राजकीय धुरंधर असलेल्या फडणवीसांच्या या सरकारने लाडका भाऊ योजना काढून विरोधकांची तोंडं चूप केली.

विरोधक चूप होतीलही. समाजमाध्यमांवर या योजनेची तेवढीच खिल्लीही उडवली जात आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही योजना आल्याने 'समजदार को इशारा काफी है' असे मतदारांचे झाले आहे. काही देशांमध्ये वैद्यकीय आणि शिक्षण या दोन्ही सेवा सरकार राबवते. त्या उलट भारतात या दोन्ही सेवांवर केंद्र आणि राज्य सरकारचे निर्बंध नसल्याने पैशांची 'व्हाईट कॉलर' सुरू आहे. या देशात मोदी यांच्या नेतृत्वातील १० वर्षे, अटलबिहारी वाजपेयी, असे अधलेमधले सरकार सोडले तर जास्तीत जास्त काळ काँग्रेस किंवा काँग्रेसच्या विचारांचे सरकार राहिलेले आहे. याच सरकारने मतांचे राजकारण करण्यासाठी 'मोफत योजना' सुरू केल्या. त्या योजना पुढे सुरू ठेवण्याची जबाबदारी पुढच्या सरकारची असते. त्या फुकट्या योजना बंद केल्या ते सरकार गरिबांच्या कसे विरोधी आहे, हे समजावून सांगण्यासाठी अनेक तज्ज्ञ याच समाजात आहेत. त्यामुळे फुकट्या योजनांची या देशात कमतरता नाही. बरं, बरेचदा असे म्हटले जाते की, सरकार राजकारणासाठी म्हणा वा मतांवर डोळा ठेवून या योजनांची अंमलबजावणी करते. तर मग कोरोनानंतर देशात दारिद्र्यरेषेखालील लोकांना प्रतिव्यक्ती ५ किलो गहू, ३ तांदूळ, १ किलो साखर तर केसरी कार्ड असलेल्यांना ४ किलो तांदूळ आणि १ किलो गहू मोफत दिला जातो. ही योजना केंद्र सरकारच्या वतीने राबविली जाते. याशिवाय घरकूल योजनाही राबविली जात आहे. कुडाच्या, पडक्या घरात राहणार्यांना सिमेंटच्या घरात राहण्याचे भाग्य लाभते आहे.

तरीही चालू अधिवेशनात आमच्या वर्धेच्या खासदारांनी घरकुलाच्या तेवढ्या लाखात घरचे शौचालयही होत नसल्याचा आरोप केला. अशाच अनेक सरकार विरोधी चर्चा होत गेल्याने भाजपा सरकारला लोकसभा निवडणुकीत जागांचा धक्का बसला. केंद्रातील भाजपा सरकारने अनेक योजना गरिबांसाठी राबवल्या तरीही या योजनांचा लाभ घेणार्यांनी लाभ देणारे सरकार येण्यासाठी बोटाला शाई लावून घेण्याची कृतज्ञता दाखवली काय? या प्रश्नाचे उत्तर शंभर टक्के राहील. मतदान हा प्रत्येकाचा हक्क आहे हे जेवढे सत्य आहे त्यासोबत आपल्याला ज्याने भरभरून दिले त्याला त्या बदलीत काही तरी देणे ही आपली संस्कृती आहे. परंतु, यावेळी मतदान करताना कृतज्ञतेपेक्षा कृतघ्नांची संख्या जात झाल्याचे दिसून आले. त्याला अनेक कंगोरेही आहेत. पण, सरसकट दिल्या जात असताना मध्यमवर्गीयांचा म्हणजे २५ ते हजार वेतन कमावणार्यांचा विचार कोणतेही सरकार करताना दिसत नाही. मोफत देत असताना कररूपाने ते आमच्याच खिशातून काढल्या जात असल्याची सामान्य लोकांची भावना आहे. त्यामुळे राज्यात लाडकी बहीण म्हणा वा लाडका भाऊ या योजनेचा फायदा आगामी विधानसभा निवडणुकीत होऊ शकेल का, याचा विचारही केला जावा. मध्यप्रदेशात कोणी शरद पवार, उद्धव वा संजय राऊत नव्हते. त्यामुळे तिथले राजकारण वेगळे आहे. महाराष्ट्रात तर कट-काटशहाचे राजकारण सुरू आहे. आजच नाही का बाळासाहेबांच्या वारसदारांनी एक तर मी राहील किंवा देवेंद्र फडणवीस राहील, अशी थेट धमकीच दिली. दोन दिवसांपूर्वी राहुल गांधींना संसदेत अभिमन्यू आठवला. त्याआधी संविधान आठवले होते. लोकसभा निवडणुकीत वर्धा जिल्ह्यात महाविकास आघाडीचा छुपा गट आतून 'प्रबोधन' मोहीम राबवत होता. इतर मतदार संघातही वेगवेगळ्या नावाने झाले असेल. याची कल्पना कोणालाच नव्हती. लोकसभेचे निकाल जेव्हा लागले तेव्हा सर्व गोष्टी डोळ्यापुढे आल्या. मतदारांना सरकारी योजना कितीही मोफत दिल्या तरी ते आपले होत नाहीत, हे सरकार लक्षात कधी घेईल आणि त्यांना मोफत देत असताना मध्यमवर्गीयांनी कात्री काय म्हणून लावून घ्यावी. तुम्ही लाडकी बहीण आणा की मोफत घरं द्या, मतदार वेळप्रसंगी सावत्र होतात हे लोकसभा निवडणुकीच्या निकालाहून समजून घ्यायला राजकारण्यांना वेगळे सांगण्याची गरज नाही. शेतकर्यांच्या उत्पादित मालाला रास्त भाव, पेट्रोल, डिझेल व गॅसचे भाव कमी होणे हेच विजयाचे सूत्र असेल याची खबरदारी घ्यायला हवी; नाही मतदार सावत्रच असतात.

# जुनी फळझाडे ठिबक सिंचन पद्धतीवर आणण्यासाठी काय कराल? वाचा सविस्तर




**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

ठराविक अंतराने पाणी देत असताना दोन पाण्याच्या पाळयात अंतर पडल्यास पिकांना पाण्याचा ताण बसतो आणि पाण्याच्या शोधार्थ मुळे आणखी खोल व दूरवर पसरतात. अशा परिस्थितीत मोठ्या क्षेत्रावर पसरलेली मुळेसंस्था असलेली फळझाडे ठिबक सिंचनाखाली आणताना तोट्या अथवा सूक्ष्मनळयाऐवजी सूक्ष्मतुषारचा वापर करणे किफायतशीर ठरते.

फळझाडांना सुरुवातीपासूनच जर ठिबक सिंचन पद्धत बसवली असेल तर पुढे पाण्याचे नियोजन करताना विशेष अडचण येत नाही. पण फळबागेस सुरुवातीस प्रवाही पद्धतीने पाणी दिले असेल आणि नंतर उद्भवलेल्या पाणीटंचाईमुळे अशा बागा ठिबक सिंचन पद्धतीवर आणावयाच्या असतील तर काही बाबी लक्षात घेणे गरजेचे असते. फळझाडांना लागवडीपासून प्रवाही सिंचन पद्धतीने पाणी दिले असल्याने फळझाडाचे संपूर्ण क्षेत्र भिजवले जाते आणि त्यामुळे त्यांची मुळे जमिनीच्या प्रकारानुसार जमिनीत खोल, सर्वदूर, लांबपर्यंत पसरलेली असतात.

जर समजा, डाळिंबाच्या झाडासाठी प्रत्येकी एक सूक्ष्मतुषार पुरेसे होते. तर द्राक्षाच्या जुन्या बागेसाठी दोन झाडांच्या ओळींना एक उपनळी टाकून दोन्ही ओळीतील लगतच्या चार झाडांना एक सूक्ष्मतुषार लावावे लागेल. सूक्ष्मतुषार सिंचनाने मुळांचे ठराविक क्षेत्रच ओले होत असल्याने जुन्या फळझाडाला अधूनमधून पाण्याचा ताण बसण्याची शक्यता असते.

यासाठी जमिनीवर झाडांच्या पानांचा व फांद्यांचा जेवढा पसारा असेल तेवढ्याच क्षेत्रावर वाफा तयार करून पहिल्या वर्षी अधूनमधून पाट पाणी द्यावे म्हणजे झाडाला ताण बसणार नाही. त्यानंतर दोन झाडातील मोकळ्या जागेत आडवी व उभी खोल नांगरट केल्याने मुळांची छाटणी होऊन पुन्हा नवीन पांढरी मुळे तयार होतात. त्याचा उपयोग झाडाच्या वाढीसाठी होतो. फळझाडांना लागवडीपासून प्रवाही सिंचन पद्धतीने पाणी दिले असल्याने फळझाडाचे संपूर्ण क्षेत्र भिजवले जाते आणि त्यामुळे त्यांची मुळे जमिनीच्या प्रकारानुसार जमिनीत खोल, सर्वदूर, लांबपर्यंत पसरलेली असतात. आणि त्यामुळे एका वर्षानंतर जुन्या फळबागा संपूर्णतः ठिबक पद्धती खाली आणता येतात.

**लेखक : डॉ . कल्याण देवळाणकर हे सेवानिवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ आहेत .**




# डोकं खूप ठणकतंय? चिमूटभर मीठ घेऊन 'हा' सोपा उपाय करा, डोकेदुखी काही सेकंदातच गायब

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

आज डोकं खूप दुखतंय हे वाक्य आपण सतत कोणाकडून तरी ऐकत असतो. किंवा आपण तरी म्हणत असतो. कारण डोकेदुखीचा त्रास खूप लोकांना सतत होतो.



डोके दुखण्याचं प्रमाण तर महिलांमध्ये जरा जास्तच आहे. सिडिटी, जेवणाच्या वेळा नियमित नसणे, कर्कश्श आवाज अशी अनेक कारणं त्यामागे आहेतच. त्यामुळे पुरुषांच्या तुलनेत महिलांना डोकेदुखीचा त्रास जरा जास्तच होतो.

म्हणूनच प्रत्येकवेळी डोकं दुखत असेल तर त्यासाठी लगेच कोणती गोळी किंवा औषधं घेण्यापेक्षा हा एक अतिशय सोपा घरगुती उपाय आधी करून पाहा...

डोकेदुखीसाठी कोणता घरगुती उपाय करावा, याविषयीची माहिती ारहळश्रग्रिीींहूर्षेपवरींळेप या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आली आहे.

यामध्ये त्यांनी असं सांगितलं आहे की डोकं दुखायला लागल्यावर एक चिमूटभर मीठ जिभेवर ठेवा. त्यानंतर ३० सेकंद डोळे मिटून शांत बसा.

त्यानंतर १ ग्लासभर पाणी प्या. हा उपाय केल्यानंतर पुढच्या काही सेकंदातच तुमची डोकेदुखी खूप जास्त कमी झालेली जाणवेल. हा उपाय केल्याने शरीरावर कोणताही दुष्परिणाम नक्कीच होणार नाही. त्यामुळे एकदा उपाय करून पाहायला हरकत नाही.

# देवाभाऊ लाडक्या बहिणींच्या सदैव पाठीशी

## डॉ. अनिल बोंडे यांची ग्वाही, उपमुख्यमंत्र्यांनी साधला संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती,-** संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कोट्यावधी माता भगिनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संवाद साधण्याकरता उत्साहित आहे. सगळ्यांना स्वाभिमानानेजगता यावं हाच देवाभाऊंचा विचार आहे. माझी माता भगिनी सर्व काम करून आपल्या कुटुंबाचा डोलारा आपल्या जीवावर सांभाळते.

देवेंद्र फडणीस यांनी सांगितले की, महिलांच्या या जडणघडणीमध्ये राज्य सरकारचा सुद्धा हातभार लागायला हवा म्हणून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. म्हणूनच देवाभाऊ हा सदैव आपल्या बहिणीच्या पाठीशी उभा राहणारा भाऊ आहे, अशी ग्वाही राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी दिली.

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा अमरावती शहर व ग्रामीणद्वारा आयोजित 'लाडक्या बहिणीचा देवाभाऊ' हा कार्यक्रम शहरातील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह येथे झाला. या कार्यक्रमामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभासी पद्धतीने महिलांशी संवाद साधला. खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी रक्षाबंधनानिमित्त सर्व महिला भगिनींना साडीचे वाटप सुद्धा केले. ह्या कार्यक्रमाला जिल्ह्यातील हजारो महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



कार्यक्रमामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महिलांशी आभासी पद्धतीने व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधताना म्हणाले की, महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावे म्हणूनच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून बहिणींना महिना १५०० रुपये माहेरचा आहेर मिळणार आहे. बहिणींच्या हितासाठी शासनाकडून आवश्यक ते सर्व प्रयत्न होत आहे. या योजनेसाठी मार्च २०२५ पर्यंतची तरतूद केली असून पुढेही दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असे ते म्हणाले.

यावेळी आ. प्रवीण पोटे, आ. प्रताप अडसड, भाजपा विधानसभा प्रमुख गोपाल चंदन, राजेश वानखडे, प्रवीण तायडे, किरण पातुरकर, शिवराय कुलकर्णी, महिला मोर्चाच्या गंगा खारकर, अनिता तिखिले, निवेदिता चौधरी, डॉ. वसुधा बोंडे, संगीता शिंदे, नितीन गुडधे, विवेक गुल्हाने, रेखा मावसकर, रमेश मावसकर, प्रशांत देशपांडे, सुरेखा लुंगारे, उषा देशमुख, भाग्यश्री देशमुख, अर्चना मुरूमकर, रूपाली सोंडे, दत्तात्रय पाटील, नीलेश शिरभाते, मनोज मोकलकर, इंद्रभूषण सोंडे यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# १० वी ते पदवी उमेदवारांना मोठी संधी

## ४०० जागांसाठी भरती सुरु; फक्त वयाची अट लागू, अर्ज करा!

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक** - अनेकजण सध्या चांगल्या नोकरीच्या शोधात आहेत. मात्र, कधी-कधी पात्रता, शिक्षण असून देखील माहितीच्या अभावी ही संधी हुकते. त्यामुळेच 'एबीपी माझा'नं पुढाकार घेत, नोकरीची संधी कु




याची माहिती गरजूंपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यामुळे नोकरीची गरज असलेले तरुण नोकरीसाठी या ठिकाणी अर्ज करु शकतील. सध्या गेल इंडिया लिमिटेडमध्ये विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी कधीपर्यंत अर्ज करु शकाल ते सविस्तर जाणून घेऊयात.

**गेल इंडिया लिमिटेड**

ढेंरश्र: ३९१ जागा

ऑपरेटर

शैक्षणिक पात्रता: B.Sc. (PCM²)

एकूण जागा - ७३

वयाची अट- २६ वर्षांपर्यंत

ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख: ७ सप्टेंबर २०२४

अधिकृत वेबसाईट- gailonline.com

**टेक्निशियन**

शैक्षणिक पात्रता: १०वी उत्तीर्ण आणि ITI

एकूण जागा - ४४

याची अट- २६ वर्षांपर्यंत

ऑनलाईन अ ज करण्याची शेवटची तारीख: ७ सप्टेंबर २०२४

अधिकृत वेबसाईट- सरळश्रेपश्रळपश.लेो

**टेक्निशियन**

शैक्षणिक पात्रता: १० वी उत्तीर्ण आणि खढख

एकूण जागा - ३९

वयाची अट- २६ वर्षांपर्यंत

ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख: ७ सप्टेंबर २०२४

अधिकृत वेबसाईट- gailonline.com

**ऑपरेटर**

शैक्षणिक पात्रता: १२ वी उत्तीर्ण आणि फायरमन ट्रेनिंग

एकूण जागा - ३९

वयाची अट- २६ वर्षांपर्यंत

ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख: ७ सप्टेंबर २०२४

अधिकृत वेबसाईट- gailonline.com

# हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०परतवाडा-** जुळ्या शहरातील हिंदुत्ववादी संघटनांनी १६ ऑगस्ट रोजी बांगलादेशात हिंदूंवर होणार्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी परतवाडा शहरातील दुराणी चौकातून उपविभागी कार्यालयापर्यंत भव्य मोर्चा काढला होता. मोर्चात 'भारत माता की जय, वंदे मातरम्' अशा घोषणा देण्यात आल्या होत्या. सदर मोचार्ला परवानगी नसल्याचे सांगून परतवाडा पोलिसांनी अनेकांवर गुन्हे दाखल केले आहे. परतवाडा, अचलपूर शहरासह तालुक्यातील हिंदुत्ववादी संघटनांनी बांगलादेशात होत असलेल्या अल्पसंख्यांक हिंदूंवरच्या अन्याया विरोधात संपाप व्यक्त करत मोर्चा काढला. बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंना संरक्षण देण्याच्या मागणीचे निवेदन सकल हिंदू समाजाच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले.या मोर्चात सहभागी असलेल्या शेकडोच्या संख्येने सहभागी सकल हिंदू समाजावर परतवाडा पोलिस स्टेशनमध्ये विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.




त्यात अक्षय मुन्ना अग्रवाल, अभय माथने, विजय वडनेरकर, पंकज गुप्ता सुनील खानझोडे, आशिष मिश्रा, चंद्रशेखर राणीवाल, भूषण नागे, मनोज भुजाडे, शुभम वानखडे, कुलदीप बावरी, सुधीर चौधरी, मयंक शर्मा, दीपक गोस्वामी, विलास अखंडे, मंगेश खेरडे, मनीष धोटे यांच्यासह इतरांचा समावेश आहे. सकल हिंदू समाजाकडून निवेदन देण्याचे ठरले होते. एका ठिकाणी सगळे गोळा होत पायी निघालो. त्यावेळी काहींनी 'भारत

## विना परवानगी मोर्चा काढल्याचे कारण

माता की जय, वंदे मातरम्' अशा घोषणा दिले. या देशप्रेम व्यक्त करणार्या घोषणा आहेत. तरी देखील आमच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले, असे अभय माथने यांनी सांगितले. आम्ही मुक मोर्चाची परवानगी मागितली होती. मोर्चा दरम्यान भारत मातेच्या जयघोषाच्या घोषणा देण्यात आल्या. कोणाच्या भावना दुखावणार नाही, याची काळजी घेण्यात आली. परंतु, परतवाडा पोलिसांनी आमच्यावर गुन्हे दाखल केले. हे खेदजनक आहे, असे विजय वडणेरकर यांनी सांगितले.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२४ शहर/ग्रामिण


# सर्व विमानतळांवर ‘मंकीपॉक्स’ तपासणी

## आरोग्य विभागाकडून मार्गदर्शक सूचना जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०नागपूर :** जगभरात ‘मंकीपॉक्स’चा प्रसार वेगाने होत आहे. त्यामुळे राज्याच्या आरोग्यसेवा संचलनालयाने सोमवारी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार आता राज्यातील सर्व आंतरराष्ट्रीय विमानतळ, बंदरांवर ‘मंकीपॉक्स’ तपासणी केली जाईल. आरोग्य विभागाला विमानतळ–बंदरांवरील आरोग्य अधिकाऱ्यांशी समन्वय साधून तपासणी सुरू करावी लागणार आहे. तसेच संशयित रुग्ण आढळल्यास त्याच्या विलगीकरणासाठी यंत्रणाही उभारण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. मंकीपॉक्सचा एक बाधित रुग्णही साथ पसरवू शकतो. त्यामुळे अशा रुग्णावर तातडीने उपचार करावे लागणार आहेत. आरोग्यसेवा संचलनालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये, संशयितांचे नमुने पुण्याच्या राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेत पाठवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. त्यात प्रत्येक बाधिताच्या संपर्कातील जवळच्या व्यक्तींचे सर्वेक्षण करावे लागेल. रुग्णालयीन सर्वेक्षणामध्ये आरोग्य विभागाला प्रत्येक रुग्णालयातील त्वचा व गुप्तरोग विभाग, औषधशास्त्र आणि बालरोग विभागातील







सर्वेक्षणावर भर द्यावा लागेल. त्यासाठी गोवर, रुबेला सर्वेक्षण पथकांची मदत घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमातील जोखमीच्या लोकसंख्येच्या नियमित सर्वेक्षणातूनही या आजाराच्या संशयितांबाबत माहिती मिळणे शक्य आहे, असेही आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनेत नमूद आहे.

**लक्षणे काय?–** मंकीपॉक्स आजारात ताप, लसिका ग्रंथी सूज, डोकेदुखी, अंगदुखी, थंडी वाजणे, घाम येणे, घसा खवखवणे आणि खोकला अशी एक वा अनेक लक्षणे दिसतात. हा सौम्य स्वरूपाचा आजार असून २ ते ४ आठवड्यात बरा होतो. लहान मुलांमध्ये आणि इतर काही जोखमीतील रुग्णांमध्ये हा आजार गंभीर स्वरूप धारण करू शकतो. या आजाराचा मृत्यूदर ३ ते ६ टक्के असल्याचेही आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनेत नमूद आहे.

# मुलींना शिक्षण मोफत तरीही शुल्क वसूलल्यास आता होणार थेट कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० अमरावती–** राज्यातील मुलींना सर्व प्रकारचे शिक्षण नि:शुल्क देण्याचे शासनाचे धोरण आहे. २०१७ साली शासनाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या राज्यातील मुलींना शिक्षण व परीक्षा शुल्क १०० टक्के माफ केले होते. आता जुलै २०२४च्या निर्णयानुसार, व्यावसायिक उच्च शिक्षण मोफत देण्याची घोषणा करण्यात आली. सक्षम केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या मुलींना १०० टक्के शुल्क माफ करण्यात आले. त्यासाठी कुटुंबाचे उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी हवे, असा निकष आहे.

विहित मार्गाने व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या मुलींना १०० टक्के शिक्षण शुल्कची प्रतिपूर्ती अनुदेय आहे. प्रवेशावेळी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच शुल्काची देय रक्कम सरकार सदर संस्थेच्या बँक खात्यात थेट जमा करणार आहे. तरीही संस्थेने शुल्क घेतले असल्यास ते परत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षा शुल्कची रक्कम पात्र मुलीच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.



२४ जुलै रोजी झालेल्या शिक्षण सहसंचालक यांच्या ऑनलाईन सभेत याविषयी स्पष्ट सूचना देण्यात आल्या. पालक व संस्थाचालक यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात आले. शुल्क न घेण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले. तरीही काही संस्था, महाविद्यालये पात्र विद्यार्थिनीकडून प्रवेशावेळी शिक्षण शुल्क घेत आहेत. तशा तक्रारी या विभागाकडे येत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे शासनाने स्पष्ट केले. शासन निर्देशांचे पालन न करणाऱ्या संस्था तसेच महाविद्यालये यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची वेळ येऊ नये, याबाबत संस्था, महाविद्यालयांनी गंभीर नोंद घ्यावी, अशी तंबी देण्यात आली आहे.

# माहुली जहागीर येथील सरपंच प्रीती बुंदीले अपात्र

## सुधीर बीजवे यांनी केली होती तक्रार,विभागीय आयुक्तांनी दिले आदेश





सरपंच प्रीती बुंदीले या भ्रष्ट आणि लाचखोर असल्याचे सिद्ध झाल्यानंतर सुद्धा त्या सरपंच पदाची धुरा सांभाळणे हे त्या पदाचा अवमान करणारे होते. त्यामुळे मी याप्रकरणी विभागीय आयुक्त यांच्याकडे प्रकरण दाखल केले होते. विभागीय आयुक्तांनी निष्पक्ष चौकशी करून प्रीती बुंदीले यांना अपात्र घोषित केले आणि खऱ्या अर्थाने याप्रकरणी मला न्याय मिळाला.

**सुधीर बीजवे** (अर्जदार) माजी सरपंच व भाजपा कार्यकर्ते,माहुली जहागीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० नांदगाव पेठ** कंत्राटदाराकडून लाच घेतल्याचा आरोप असलेल्या माहुली जहागीर येथील महिला सरपंच प्रीती मनोज बुंदीले यांना सरपंच तथा सदस्य पदावरून अपात्र घोषित करण्यात आले आहे. माहुली जहागीर येथील माजी सरपंच व भाजपा कार्यकर्ते सुधीर बीजवे यांनी याबाबत दाखल केलेल्या तक्रारीवर नुकताच विभागीय आयुक्तांनी हा निकाल दिला.

प्रीती बुंदीले यांच्यावर गैरवर्तन व लज्जास्पद वर्तन केल्याचा ठपका ठेवत त्यांना अपात्र करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१५ व्या वित्त आयोग योजनेअंतर्गत माहुली जहागीर येथे पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापनचे कंत्राटदार रामबाबू गणेशराव मोंढे यांनी कामे पूर्ण केल्यानंतर त्या कामाचे कमिशन म्हणून सरपंच पती मनोज बुंदीले यांनी कंत्राटदार मोंढे यांना पाच हजार रुपये मागितले होते त्यामुळे मोंढे यांनी २६ सप्टेंबर २३ रोजी मनोज बुंदीले यांना चार हजार रुपयांची लाच देतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले होते. सरपंच प्रीती बुंदीले या मात्र फरार होत्या.न्यायालयाने त्यांना निवडक अटी व शर्थीवर अग्रीम जमानत दिली होती.परंतु त्यानंतर सुद्धा त्या पदावर कायम असल्याने ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम (३९) १ नुसार सुधीर बीजवे यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे प्रकरण दाखल केले होते. ७ ऑगस्ट २०२४ रोजी विभागीय आयुक्त यांनी याप्रकरणी अंतिम सुनावणी करत अर्जदार सुधीर बीजवे यांनी दाखल केलेल्या प्रकरणावर सरपंच प्रीती बुंदीले या सरपंच पदावर व सदस्य पदावरून अपात्र करण्यात आल्याचा निर्णय देऊन सुधीर बीजवे यांचे प्रकरण निकाली काढण्यात आले.प्रीती बुंदीले यांच्या नावाने त्यांचे यजमान मनोज बुंदीले यांनी लाच घेतली होती.

कमिशन साठी हपापलेल्या या दाम्पत्याने पदाचा दुरुपयोग करून ग्रामपंचायत मध्ये प्रचंड भ्रष्टाचार केला असे अनेक आरोप त्यांच्यावर होत आहे.

# आमचे दैवत, आमचा देव्हारा सर्व काही आमचा कॅमेरा, कॅमेराचा केला नेत्रदिपक सन्मान

## अंबानगरी फोटो-व्हिडिओ ग्राफर्स असो. ने काढली भव्य दिंडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती–** आमचे दैवत, आमचा देव्हारा सर्व काही आमचा कॅमेरा म्हणत १९ ऑगस्ट जागतिक छायाचित्र दिनाच्या पर्वावर शहर–जिल्ह्यातील छायाचित्रकारांनी कॅमेराचा नेत्रदिपक सन्मान केला. अंबानगरी फोटो–व्हिडीओग्राफर असोसिएशनच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य कॅमेरा दिंडी काढली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मा उपायुक्त नरेंद्र वानखडे मनपा यांच्या हस्ते पालखीत ठेवलेल्या कॅमेराचे पुजन करण्यात आले. अंबानगरी फोटो व्हिडिओ ग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजेश वाडेकर, सचिव आकाश लादे, कोषाध्यक्ष निखिल तिवारी यावेळी उपस्थित होते

यानंतर अंबानगरी फोटो–व्हिडिओ ग्राफर्स असोसिएशनवर गाण्यावर दिंडी ला सुरुवात झाली दिंडी

यावेळी उपस्थित सर्व छायाचित्रकारांनी कुर्ता–पयजामा व त्यावर विविध रंगाचे फेटे परिधान केल्याने दिंडीला एक वेगळीच शोभा आली होती. दिंडीला श्री अंबा व एकविरा देवी मंदिर येथुन सुरूवात झाली. जय फोटो स्टुडिओ येथे पालखीचे दलाल कुटूंबियांनी पुजन केले. दमलेल्या छायाचित्रकारांकरिता कृष्णा लॅब स्टुडिओच्या वतीने या मार्गावर थंड पाणी व चहा व्यवस्था करण्यात आली होती. डिजे या दिंडीचे विशेष आकर्षण होते. यावेळी छायाचित्रकार डिजेच्या तालावर मनमुराद थिरकले.

यानंतर राजकमल चौकात शहरातील फोटोग्राफर यांनी ऊा च्या तालावर डांस केले तेथून जयस्तंभ चौक येथील महात्मा गांधीजी यांच्या पुतळ्याला हार अर्पण करण्यात आले. त्यानंतर इर्विन चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार अर्पण करण्यात आले. त्यानंतर दिंडीचा समारोप करण्यात आला. प्रकल्प प्रमुख–अजिंक्य सातपुते, गजानन अंबाडकर, अक्षय इंगोले, निखिल तिवारी ,व माजी अध्यक्ष अनिल सातपुते, अनिल पडीया, विजय देवणी, मनीष जगताप,राहुल पवार उपाध्यक्ष राहुल पालेकर,गजानन अंबाडकर, प्रतीक रोहनकर,सदस्य निलशाम चौधरी, प्रशांत टाके, रुपेश फसाटे, संजय साहू, धीरज मानमोडे, पुष्पक राऊत, नितेश झा, संजय वाडकर, सागर काजले, दिलीप जिरापुरे, प्रशांत गजभिये, संदीप नाईक, पवन देशमुख, मोहन देशमुख, आशिष अरविकार छाया ताई काळमेघ, सचिन देशमुख,महेंद्र मोहोड,अनंत जमोदकर, हेमंत श्रीवास्तव, सोहेल अहमद, तन्वीर भाई,पुष्पक राऊत, मोहन कोहळे, अक्षय डोईफोडे, शुभम डोईफोडे, शुभम लाटे, मोहसीन भाई, आदित्य ठाकरे, मयूर कासार, संयम सिंघई आणि जिल्ह्यासह बाहेर जिल्ह्यातील छायाचित्रकारांनी आपली उपस्थिती राखली होती. अंबानगरी फोटो व्हिडिओ ग्राफर्स असोसिएशनचे सर्व पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.






# २०० किमी रोज फिरा रस्त्यांतील खड्डे तपासा!

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंत्यांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती –** पावसाळ्यात रस्त्यावरील खड्डे भरण्याबाबत केलेल्या सूचनांचे पालन होत नसल्याने लोकांमध्ये नाराजी आहे. निवडणुकीच्या तोंडावर शासनाची प्रतिमा मलीन होत असल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याने रस्ते वाहतुकीयोग्य आहेत किंवा नाही हे पाहण्यासाठी वरिष्ठ अभियंत्यांना दररोज २०० किलोमीटर पाहणी करणे बंधनकारक केले आहे. यात कुचराई करणाऱ्यांना शिस्तभंगाच्या कारवाईला तोंड द्यावे लागणार आहे.

रस्ते खड्डेमुक्त करून वाहतुकीयोग्य करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंत्यांना एका परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत. आपल्या अखत्यारीत असलेले रस्ते सुयोग्य आहेत किंवा नाही याची पाहणी करण्यासही सांगण्यात आले आहे. मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंत्यांना आठवड्यातील दोन दिवस, तर कार्यकारी अभियंत्यांना आठवड्यातून तीन दिवस दररोज २०० कि.मी. रस्त्यांची पाहणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



पाहणी दरम्यान केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल शासनाला सादर करायचा आहे. कुठल्याही परिस्थितीत ३१ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त रस्ते मोहीम पूर्ण करावी, अशा स्पष्ट सूचना सार्वजनिक बांधकाम खात्याचे अतिरिक्त सचिव पद्माकर लहाने यांनी परिपत्रकातून दिल्या आहेत.

# श्री समर्थ लहानूजी महाराज पुण्यतिथी महोत्सव

## खासदार,आमदार तथा हजारो च्या संख्येत श्रद्धांजली पार पडली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०टाकरखेडा**

वर्धा नदीच्या तिरावर असलेले टाकरखेडा वसलेले गाव आहे.श्री समर्थ लहानूजी महाराज यांच्या ५३ वा सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळा आज उत्सहात संपन्न झाला.हा पुण्यतिथी महोत्सव दि १२ ऑगष्ट ते १९ ऑगष्ट दरम्यान श्री क्षेत्र टाकरखेडा येथे संपन्न झाला.या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या सप्ताहा ची तीर्थस्थापना श्री नितीनजी सिरळसकर यांच्या हस्ते झाली तसेच आज गोपाल काल्याच्या व महाराजाना श्रद्धांजली देण्यासाठी असंख्य भक्तगणांनी टाकरखेड ला गर्दी केली होती.वर्धेचे माननीय खासदार अमर काळे,आर्वी चे विद्यमान आमदार दादाराव केचे तथा अमरावती खासदार बळवंत वानखडे व वेगवेगळ्या संस्थांनचे अध्यक्ष हजर होते.श्री संत लहानूजी महाराज संस्थांन कार्यकारी संचालक सुरेश उर्फ बाळासाहेब पावडे यांनी संस्थान च्या उपक्रमा विषयी माहीती सांगितली.श्री अमोल बांबल यांच्या संगीतमय कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला.राष्ट्रीवंदनेने कार्यकमाची सांगता करण्यात आली.

# पांढरा हत्ती ठरत असलेल्या केंद्रीय लिंबूवर्गीय फळ, संशोधन संस्थेला शेतकऱ्यांच्या बांधावर आणा!

## संत्र्याला लागली गळती ; निम्म्यापेक्षाही कमी संत्री झाडावर शिल्लक !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०मोर्शी–** नागपुरी संत्री असं नुसतं नाव जरी काढलं तरी अनेकांना या भागातील संत्रा फळाबद्दल आकर्षक वाटते. परंतु हा संत्रा पिकवणारा शेतकरी मात्र सलग सातव्या वर्षी मेटाकुटीला आला आहे. त्याच मुख्य कारण म्हणजे संत्राबागांना लागलेली गळती. मागील दोन महिन्यांपासून अति पावसामुळे संत्रा उत्पादक शेतकरी हलाखीच्या परिस्थितीमध्ये सापडला आहे. सुरुवातीला हजारो संत्रा फळांनी बहरलेल्या संत्रा झाडावर मात्र आता निम्म्यापेक्षाही कमी संत्रा शिल्लक असल्याचे पहायला मिळत आहे. मोर्शी वरूड तालुका विक्रमी संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून संत्रा उत्पादक शेतकरी संत्रा गळतीमुळे संकटात आला असून कोट्यावधी रुपयांचे नुकसान संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे होत असतांना संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली असून सुद्धा केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेचे व कृषी विभागाचे उदासीन धोरण जबाबदार ठरत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे. केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था – सीसीआरआयने तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोचवण्यासाठी एक उत्प्रेरक (कॅटलिस्ट) म्हणून काम करायला पाहिजे. या संस्थेमधील उत्तम तंत्रज्ञान कृषी क्षेत्राच्या गुणात्मक वृद्धीसाठी कामी आलं पाहिजे. संस्थेन जगातील सर्वोत्कृष्ट पद्धतींचा अवलंब करण्यासाठी संस्थासोबत संयुक्त भागीदारी केली पाहिजे, केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन संशोधन केले पाहिजे, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर बुरशीनाशके, कीटकनाशके, उपलब्ध करून देण्यात आले पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयाचे उपसंचालक उज्वल आगरकर, उप विभागीय कृषी अधिकारी प्रफुल सातव यांच्याकडे रेटून धरली असून पांढरा हत्ती ठरत असलेल्या केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेला शेतकऱ्यांच्या बांधावर आणा अशी आग्रही मागणी सुद्धा करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके, ग्राम पंचायत सदस्य सचिन उमाळे, मंगेश होले, अतुल काकडे, संजय निमजे, गजानन निमजे, प्रदीप वानखडे, यांच्यासह शेकडो संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.



### शासनाने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना सोडले वाऱ्यावर !

अमरावती जिल्ह्यातील शेतकरी संत्रा गळतीमुळे हवालदिल झाला आहे. शेतकरी महागडी औषधे वापरत असला तरी याचा काहीएक फायदा होत नाही. परिणामी आर्थिक खर्चात वाढ आणि उत्पन्न कमी अशा अवस्थेत शेतकरी अडकला असतांना केंद्रिय फळ संशोधन संस्थेचे संशोधक व कृषी विभागाच्या तज्ञांकडून, शासनाकडून अजूनही ठोस उपाय योजना होतांना दिसत नसल्यामुळे सातत्याने होणारी संत्रा गळती ही संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मुळावर उठली आहे – **रुपेश वाळके शेतकरी–**

# यंदा मातीचा बाप्पा...

## मूर्तिकार संघटनेचे ७५ हजार पर्यावरण पूरक मूर्ती तयार करण्याचे लक्ष

### महापालिका व मूर्तिकार संघटनेचा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती : –** शहरात आता गणरायाच्या आगमनाची तयारी सुरू झाली असून, यावर्षीच्या गणेशोत्सवासाठी जवळपास ७५ हजार पर्यावरणपूरक मूर्ती तयार करण्याचे लक्ष्य मातीच्या मूर्तीकार संघटनेने ठेवले आहे.

येत्या ७ सप्टेंबर रोजी गणरायाचे आगमन होणार आहे. त्याअनुषंगाने बडनेरासह राजापेठ, कुंभारवाडा, दस्तूरनगर, एमआयडीसी परिसर, बुधवारा आदी विविध भागांतील मूर्तिकारांच्या कारखान्यांत मातीच्या मूर्ती बनविण्यात येत आहेत. गेल्या काही वर्षांपासून दरवर्षी महानगरपालिकेचा पर्यावरण विभाग व शाडू माती मूर्तिकार संघटनेच्या पुढाकारातून गणेशभक्तांसाठी मुबलक प्रमाणात आकर्षक मातीच्या मूर्ती उपलब्ध करून दिल्या जात आहे. सुरुवातीला ८ हजार मातीच्या मूर्तीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यानंतर मागील वर्षी ७० हजार मातीच्या मूर्ती बनविण्यात आल्या. यावर्षी यात आणखी ५ हजारांची वाढ करून शहरातील प्रत्येक गणेशभक्ताला पर्यावरणपूरकच गणेश मूर्ती उपलब्धकरून देण्याचा मानस मूर्तिकारांनी व्यक्त केला आहे. गणेशोत्सवाचे आगमण अवघ्या दोन आठवड्यांवर आले आहे. दुसरीकडे महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून 'पीओपी'ला पर्याय सूचविण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेने चार फुटांवरील गणेश मूर्तीसाठी पीओपीचा वापर करण्याची परवानगी दिली आहे. चार फुटांपेक्षा कमी उंचीच्या मूर्तीसाठी मात्र शाडू माती बंधनकारक करण्यात आली आहे, अशी माहिती महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, महानगरपालिकेने शहरात पर्यावरणपूरक मातीच्या मूर्ती तयार करण्यासाठी मूर्तिकारांचे प्रबोधन करून त्यांना प्रोत्साहित केले. परिणामी महापालिका क्षेत्रात मोठ्या संख्येने मातीच्या मूर्ती तयार केल्या जात आहे. व्यापक जनजागृतीमुळे नागरिकांचाही कल पर्यावरणपूरक मूर्तीकडे वाढला आहे.

# वाहतूक शाखेकडून अनोखे रक्षाबंधन साजरे

## महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्मिती ही पोलिसांसह समाजातील सर्व घटकांची जबाबदारी- पोलिस आयुक्त



*विदर्भ प्रजासत्ताक*
*दि.२०अमरावती– महिलांसाठी शहरात सुरक्षित वातावरण आवश्यक आहे. ते निर्माण करण्याची जबाबदारी पोलिसांसह समाजातील सर्व घटकांची आहे, असे प्रतिपादन पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सोमवारी शहर वाहतूक शाखेकडून आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमात केले.*

*या रक्षाबंधन सोहळ्याला पोलिस आयुक्तांसह तिन्ही पोलिस उपायुक्त कल्पना बारवरकर, गणेश शिंदे व सागर पाटील हे प्रामुख्याने उपस्थित होते. पोलिस आयुक्त म्हणाले, जातीय सलोखा कायम ठेवावा. तसेच कोणाच्याही धार्मिक भावना दुखावतील, अशी पोस्ट करू नये. सोशल मीडियावर पोलिसांची बारकाईने नजर आहे. शहरात महिलांना सुरक्षित वातावरण निर्मिती ही पोलिस तसेच समाजातील सर्व घटकांची जबाबदारी आहे.*

*समाजातील कोणत्याही घटकास महिलासंबंधी गैरप्रकार आढळून येताच तत्काळ पोलिसांशी थेट किंवा डायल ११२ वर संपर्क करून अप्रिय घटना टाळण्याचे आवाहन त्यांनी केले.*

*या वेळी वाहतूक नियमांचे पालन करण्याची हमी हीच खरी वाहतूक पोलिस भगिनींना ओवाळणी ठरेल, या उद्देशपूर्तीसाठी प्रथमच वाहतूक शाखेतील महिला अधिकारी अंमलदारांनी सोमवारी अनोखे रक्षाबंधन साजरे केले. पोलिस आयुक्तालयातील जातीय सलोखा अबाधित राखून रक्षाबंधन निमित्त 'रस्ते सुरक्षा व वाहतूक नियमन पालन हिच जीवन रक्षणाची हमी' यासाठी पोलिस आयुक्त रेड्डी यांच्या संकल्पनेला मूर्तरुप देण्यात आले.*

*वाहतूक पोलिस निरीक्षक रिता उईके व ज्योती विल्लेकर यांच्या नेतृत्वात पूर्व व पश्चिम वाहतूक विभागातील अधिकारी, अंमलदारांच्या उपस्थितीत नागपुरी गेट चौक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सीपी, डीसीपी, एसीपींसह एचव्हीपीएम हेल्पलाईन डेस्क व शांतता समिती सदस्य, ऑटो चालक, मालक संघटनेचे पदाधिकारी, सदस्य, सामान्य वाहन चालक उपस्थित होते.*

# सोयाबीनचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच भाव गडगडले

## मार्केट मध्ये ४००० रु तर ४८९२ हमीभाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–** सोयाबीनचा हंगाम सप्टेंबर महिन्यात सुरू होत आहे. त्यापूर्वीच व्यापाऱ्यांनी भाव पाडल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. केंद्र शासनाने सोयाबीनचा हमीभाव ४,८९२ रुपये प्रति क्विंटल जाहीर केला आहे. त्या तुलनेत सध्या सोयाबीनला ४ हजार रुपयेच भाव मिळत आहे. हंगामात यापेक्षा कमी भाव राहण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सोयाबीनचा हंगाम महिनाभरात सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर सोयाबीनच्या दरात मोठ्या प्रमाणात कमी आलेली आहे. मागच्या हंगामात सरासरीपेक्षा कमी पावसाने सोयाबीनच्या उत्पादनात कमी आलेली आहे. त्यामुळे मागणी वाढून दरवाढ प्रत्यक्षात सोयाबीनचे दर ४,२०० ते ४,३०० रुपये क्विंटलदरम्यान स्थिरावले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च निघालेला नाही. दरवाढीची शक्यता नसल्याने शेतकऱ्यांना साठवणूक केलेले व सोयाबीन विकावे लागले.यंदा दीड महिन्यापासून ढगाळ वातावरण, सूर्य प्रकाशाचा अभाव, सततचा पाऊस यामुळे सोयाबीनवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव झालेला आहे. त्यामुळे उत्पादनात कमी येण्याचीशक्यता आहे. अशा परिस्थितीत सोयाबीनच्या दरात हंगामापूर्वीच कमी आल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

# लालपरीने देवदर्शन बिनधास्त करा

## खिशाला नाही पडणार भार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**
राज्यातील सर्व धर्मी यांमधील ६० वर्षे वय किंवा त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना एकदा तरी तीर्थक्षेत्री जाण्याची इच्छा असते.

गोरगरीब, सर्वसामान्य कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक त्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे तीर्थस्थळाला जाऊ शकत नाही, सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थस्थळांना जाता यावे यासाठी राज्य सरकारने भारतातील तसेच राज्यातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची, दर्शनाची संधी देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाने केले आहे.योजनेचा लाभ घेण्याकरिता अधिकाधिक नागरिकांनी अर्ज करण्याचे तसेच अधिक माहिती करीता सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्याशी संपर्क करावा, असे सामाजिक न्याय विभागाने कळविले आहे.


### अशा आहेत अटी

राज्यातील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिक असावा. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपर्यंत असणे अनिवार्य, अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब योजना, वार्षिक उत्पन्न २.५० लाखांच्या आत असलेले मात्र प्राधान्य कुटुंब नसलेले शिधापत्रिकाधारक, वैद्यकीय अधिकाऱ्याने पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे,

कलर बॉक्सअशी आहे योजनाया योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य व

भारतातील प्रमुख तीर्थस्थळाचा समावेश राहणार आहे. योजनेंतर्गत निर्धारित तीर्थस्थळापैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एकवेळ लाभ घेता येणार आहे. प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती ३० हजार रुपये इतकी राहणार आहे. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इ. सर्व बाबीचा समावेश आहे. अर्जदार ७५ वर्षांच्या वरील असल्यास त्यांच्यासोबत पती, पत्नी किंवा सहायक तीर्थदर्शनाच्या प्रवासासाठी इच्छुक असल्यास सहायकाचे संपूर्ण नाव व त्याचे वय २१ वर्षे व कमाल ५० वर्षे असावे.

# विद्यापीठातर्फे प्रज्ञाचक्षू श्रीसंत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला २३, २४ ऑगस्ट रोजी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने स्व. वासुदेवराव राजारामजी देशमुख यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून 'प्रज्ञाचक्षु श्रीसंत गुलाबराव महाराज' व्याख्यानमालेचे आयोजन २३ व २४ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेचे प्रथम पुष्पशुक्रवार, २३ ऑगस्ट दुपारी १२ वाजता सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगाव, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आले आहे. व्याख्यानमालेच्या प्रथम पुष्पाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते भूषविणार आहे. 'श्रीसंत गुलाबराव महाराजांची समाजाभिमुखता' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून माजी न्यायमूर्ती सुदाम देशमुख अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. प्रथम पुष्पाला विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे आरोग्य व शिक्षक प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र शिगणे वमाजी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प शनिवार, २४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार, अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते भूषविणार आहे. 'श्री संत गुलाबराव महाराजांची समाजाभिमुखता' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून माजी न्यायमूर्ती सुदाम देशमुख अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. द्वितीय पुष्पाला विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, गो. सी. टोमणे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्टचे अध्यक्ष भाष्कर टोम्ये व माजी प्राचार्य डॉ. अरविद देशमुख आदी यावेळी उपस्थित राहतील.–

# जिल्ह्यातील 3,९७५ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार

## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमाफीचे पोर्टल पुन्हा सुरू होणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती –** पाच वर्षांपूर्वी सुरू झालेल्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमाफी योजनेतील वंचित राहिलेल्या ३ हजार ९७५ शेतकऱ्यांना निवडणुकीपूर्वी कर्जमाफी योजनेचा लाभ मिळणार आहे. दिवाळीपासून बंद असलेल्या या योजनेचे पोर्टलदेखील प्रोत्साहन अनुदान योजनेच्या धर्तीवर सुरू होणार आहे. याबाबत सोमवारी सहकार आयुक्तांनी व्हीसीद्वारे सुतोवाच दिले आहे. याच आठवड्यात सदरचे पोर्टल

सुरू होण्याचे संकेत आहेत.सन २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडीच्या सरकारने महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा करीत अंमलबजावणी सुरू केली होती.

सोबतच प्रोत्साहन अनुदान योजनादेखील सुरू केली.साडेचार वर्षांच्या कालावधीत १ लाख ३३ हजार ९७४ शेतकऱ्यांनी कर्जमाफीकरिता अर्ज केले होते. यातील १ लाख २३ हजार १५६ लाभार्थी कर्जमाफीकरिता पात्र झालेत. यापैकी १ लाख २० हजार ९०३ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण झाल्याने यातील १ लाख १९ हजार १८१ शेतकऱ्यांना ८५७ कोटी १९ लाखांची कर्जमाफी देण्यात आली. परंतु, यातील १ हजार ७२२ शेतकऱ्यांना अद्यापहीकर्जमाफीचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे सदर शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत होते. तर मधल्या काळात या योजनेचे पोर्टल मध्येच बंद करण्यात आल्याने २ हजार २५३ शेतकऱ्यांचे मात्र आधार प्रमाणिकरण रखडले होते. असे एकूण ३ हजार ९७५ शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असताना त्यांच्या कर्जमाफीचे स्वप्न पूर्ण होण्याची आशा धुसर झाली होती.

परंतु, प्रोत्साहन योजनेचे पोर्टल पुन्हा सुरू केल्याने याच धर्तीवर कर्जमाफीचे देखील पोर्टल सुरू करण्याबाबतचे सुतोवाच सहकार आयुक्तांकडून मिळाले आहे. त्यामुळे आता कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या ३९७५ शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यातील २२५३ शेतकऱ्यांना आधी आधार प्रमाणिकरण करणे गरजेचे आहे. या आठवड्यात हे पोर्टल सुरू करण्याचे संकेत मिळत आहे.